गोवा सरकार
माहिती आणि प्रसिध्दी खात
पणजी-गोवा
वार्तापत्र

# साळगांव येथील गोवा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मुख्यमंत्र्याची भेट

ता. 19 जून 2019
29 ज्येष्ठ 1941

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साळगांव येथील गोवा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट दिली. मुख्यमंत्री म्हणून भेटीचा आनंद व्यक्त करताना डॉ. सावंत यांनी आपण गोवा राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष असताना या प्रक्रिया प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आल्याचे स्मरण करून दिले. आमदार श्री. जोशुआ डिसौझा, घनकचरा व्यवस्थापन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. लेविन्सन मार्टीन्स आणि इतर यावेळी उपस्थित होते.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या अधिका-यांशी झालेल्या आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांनी सदर प्रकल्पाच्या कार्यावर चर्चा केली. प्रतिदिन सुमारे 150 टन कच-याची या प्रकल्पात व्यवस्थितपणे प्रक्रिया केली जाते. अशाच प्रकारचे कचरा प्रक्रिया प्रकल्प कुंडई, पिसुर्ले आणि कोलवाळ औद्योगिक वसाहतीत उभारण्यासाठी ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. दोन वर्षानंतर सर्व प्रकारच्या कच-यांवर प्रक्रिया करणारे गोवा हे एकमेव राज्य ठरेल अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

सरकारने बायो टॉयलेटचीही कल्पना सुरू केली असून एकूण 17 हजार बायोटॉयलेटची मागणी राज्यातील सर्व पंचायतीमधून करण्यात आली आहे. टॉयलेटसाठी सर्वसाधारण गटासाठी 10 हजारावरून 4 हजारापर्यंत खर्च कमी करण्यात आला. इतर मागास वर्गासाठी 2500 रूपये आणि वर्गीकृत जमातीसाठी 1 हजार रूपये. गोवा घनकचरा व्यवस्थापन महामंडळ हा कार्यक्रम यशस्वी बनविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे 31 जुलैपर्यंत राज्य हगवणदारी मुक्त बनेल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मा/वाप/एनजी/जॉआ/रना/सुसुका/2019/344